


भटकंती

धोम मुक्कामी !








धोम म्हटले, की सातारा जिल्ह्यातील धरण डोळ्यांपुढे येते. या धरणाच्या भिंतीजवळच धोम नावाचे छोटेसे गाव. या धरणाबरोबरच या गावातही खूप पाहण्यासारखे.

अभिजित बेल्हेकर

एक सुटी एक आडवाट असे ठरवत गावोगावी हिंडण्याचे व्यसन लागले, की नवनवा प्रांत, स्थळकाळ, माणसे, निसर्ग भेटत जातो. महाराष्ट्राची दक्षिण काशी असलेल्या वाईहून पश्चिमेला कृष्णेच्या खोऱ्यात शिरले, की या अशाच निसर्ग नवलाईत हरवायला होते. उजव्या हाताला सह्याद्रीची उपरांग रायरेश्वर तर डाव्या बाजूला कृष्णेचे नुकतेच रांगू लागलेले खळाळते पात्र. या दोन्हीच्या मधून धावणारी ती वाट. या वाटेवर वाई, मेणवली, भोगाव, धोम असे एकेक थांबे. या प्रत्येक थांब्यावर काहीतरी अडवणारे, गुंतवणारे. यातल्याच धोम क्षेत्री आजचा मुक्काम!

धोम म्हटले, की सातारा जिल्ह्यातील धरण डोळ्यांपुढे येते. या धरणाच्या भाळी टिळा लागल्याप्रमाणे हे छोटेसे गाव. निसर्गडोंगर, शेतीवाडीत रमलेले, शांततेत पहुडलेले. वाईपासून धोम नऊ किलोमीटरवर. गावात शिरताच कृष्णाकाठच्या नृसिंह मंदिरात येत आपला प्रवास थांबतो. एखाद्या छोट्या भुईकोटासारखी तटबंदी आणि त्याच्या आत मंदिर. दोन बुरुजांनी युक्त महाद्वार. बसण्यास ओटे, रेखीव कमान आणि डोईवर पुन्हा नगारखाना.

आत शिरताच विविध छोट्या मोठ्या मंदिरांचा समूह दिसतो. यात मुख्य महादेवाचे तर एका गोलाकार ओट्यावर नृसिंहाचे मंदिर. एकप्रकारे हे हरि-हर यांचे एकत्रित स्थान. सुरुवातीला महादेवाचे देखणे मंदिर लक्ष वेधून घेते. खरेतर





हे शिवपंचायतन. चार दिशांना विष्णू, गणपती, सूर्य आणि शक्ती देवतांची छोटी राऊळे तर मधोमध एका उंच चिरेबंदी चौथऱ्यावर महादेवाचे कळशीदार देखणे मंदिर. या देवता, त्यांची मंदिरे जेवढे लक्ष वेधून घेतात त्याहून अधिक नजर ती या मंदिरापुढील नंदी मंडपाच्या देखाव्यात अडकते.

कमळाच्या आकारात बांधलेली ही एक सुंदर अशी पुष्करणी. गोलाकार पाण्याचे मोठे कुंड आणि भोवतीने कमळाची ती १६ दले. अत्यंत रेखीव असा आकार आणि तेवढेच कोरीवकाम. या कुंडात मधोमध एक मोठा दगडी बांधीव चौथरा. या शिळांमधूनच कोरलेली कासवाची भव्य रचना. या कासवाच्या पाठीवर मग तो नंदी विराजमान झालेला. या नंदीवर पुन्हा सहा रेखीव कमानींचा मंडप आणि त्यावर बारीक नक्षीदार असे शिखर...केवळ सुंदर असा हा देखावा.

असे वाटून जाते, ज्यावेळी हे कमळाच्या आकारातील कुंड पाण्याने भरत असेल त्यावेळी हे दृश्य किती सुंदर दिसत असेल. पाण्याने भरलेली ही पद्मपुष्करणी. त्यात तरंगणारे हे कासव आणि त्याच्या पाठीवर स्वार झालेला हा नंदी मंडप. एका कलास्थापत्याने फुलवलेला हा आभास, निर्माण केलेले सौंदर्य. या मेघडंबरीतील तो नंदीदेखील तेवढाच देखणा. त्याच्या पाठीवरील झूल, गळ्यातील साखळी, घंटेच्या माळा हे सगळे खूप सर्जकतेने कोरलेले. जणू आताच कुणीतरी अंगावर चढवल्यासारखे. शिवाच्या मुख्य मंदिराचा प्रवेशमार्गाही तितकाच देखणा, अगदी दगडात गालिचा अंथरल्यासारखा. पायाशी असलेले कीर्तिमुखही असेच रेखीव. डोक्यावर शिंग, गोलाकार कान, उघडलेला जबडा, त्यातील सुळे आणि चेहऱ्याभोवती पक्ष्यांची जोडी... सगळे सूक्ष्मपणे कोरलेले. प्रश्न पडतो हे सारे काम कुणा मूर्तिकाराचे की नाजूक हातांनी अलंकार घडवणाऱ्या कलाकाराचे!

हे पाहत पुढे वळावे तो सभामंडपात एक आगळेवेगळे शिल्प वाट पाहात असते. एका संगमरवरी स्तंभावर शिरोभागी पंचमुख महादेव कोरलेला. शिल्प जितके दुर्मीळ तेवढेच सुंदर. चार दिशांना चार तर पाचवे ऊर्ध्वमुख आकाशाकडे पाहणारे. आमच्या पंचमहाभूतांचीच ही जाणीव. प्रत्येक गोष्ट अचंबित करणारी. या शिल्पाला साठवावे तो पुढे एका गोलाकार ओट्यावर श्री लक्ष्मीनृसिंह मंदिर बोलावत असते.


या एकाच स्थळी पूर्व-पश्चिम असे दोन कोनाडे. नृसिंहाची उग्र आणि प्रसन्न अशी ती दोन रूपे इथे दर्शन देणारी. पूर्वेचा नृसिंह हा हिरण्यकश्यपूचा वध करणारा. क्रोधित चेहरा, डोळे - जीभ बाहेर आलेली; उजव्या वरील हातात पद्म, तर डाव्या हातात शंख. खालील दोन्ही हात हिरण्यकश्यपूच्या पोटावर शिक्षा करण्यासाठी आलेले. सोबत लक्ष्मी, तीदेखील भयभीत झालेली.

तर पश्चिमेकडील शिल्पात हेच लक्ष्मीनृसिंह शांत, प्रसन्न रूप धारण केलेले. इथे वरील दोन हातात विष्णूची उर्वरित चक्र आणि गदा ही आयुधे. तर खालील दोन हात प्रसन्न मुद्रेत. एकाच स्थळी नृसिंहाची ही दोन शिल्पे. त्याची दोन रूपे, भाव आणि त्यामागचा हा विचार. मंदिराला लागूनच कृष्णा नदी वाहते. तिच्या काठावर ऐतिहासिक घाट. या घाटावरही श्री गायत्री आणि अन्य काही शिल्पं.

हे सारे पाहिले, की प्रश्न पडतो, कुणी केले हे सारे निर्माण. मग कथा अगदी पुराणात शिरते. धौम्य ऋषींची ही तपोभूमी. त्यातूनच या स्थळाला महत्त्व आणि नाव प्राप्त झाले. असे म्हणतात याच काळात इथे हरि -हर यांची स्थापना झाली. मराठा कालखंडात १७८० साली त्यावर पुण्यातील एक सावकार महादेव शिवराम यांनी ही देखणी मंदिरे थाटली. राजसत्तांनी भोवतीने तटबुरूज, नदीकिनारी घाट बांधले.

हा सारा इतिहास, निर्माण पाहिले, अनुभवले की आमच्या पूर्वजांच्या सौंदर्यदृष्टीचे खूप कौतुक वाटते. माणूस भटके जीवन सोडत स्थिर होऊ लागला तसा तो नदीकिनारी रमला, तिथेच त्याने वस्ती केली. या किनाऱ्यांना पुढे इतिहासाने असे रेखीव मंदिर, घाटांचे बाजूबंद चढवले. धोमच्या या कृष्णाकिनारी, शांत रमणीय घाटावर आले, की ही जाणीव जिवंत होते. आमचीच हरवलेली ही सौंदर्यदृष्टी पुन्हा साद घालू लागते!

■ abhijit.belhekar@expressindia.com





गाव पर्यटन

जयगड !



रेखा भिंताडे

गणपतीपुळ्याला गणेशाच्या दर्शनासाठी अनेकजण जातात. पण या परिसरातील अन्य स्थळांकडे मात्र या भटक्यांचे दुर्लक्ष होते. या उपेक्षित स्थळांमध्येच जयगड.

गणपतीपुळ्यापासून जयगड २५ किलोमीटर अंतरावर. मुंबई-गोवा महामार्गावरून जायचे असल्यास गणपतीपुळ्याला न जाता निवळी फाट्यावरून जयगडला जाण्यासाठी फाटा फुटतो. या रस्त्यावर अगदी शेवटचा थांबा म्हणजे जयगड गाव आणि त्याला खेटूनच हा जलदुर्ग.

कोकणातील शास्त्री नदी जिथे समुद्राला मिळते, त्या खाडीच्या मुखाशी समुद्रालगत एका छोट्या टेकडीवर हा जयगड उभा. एका छोट्या टेकडीवरील माथ्याच्या भागात बालेकिल्ला तर पश्चिम अंगास समुद्राकडील भागात माचीचा भाग अशी गडाची दोन टप्प्यात रचना आहे. गंमत अशी, की या अशा भूरचनेमुळे आपला प्रवेश मात्र थेट बालेकिल्ल्यात होतो. जयगडच्या बालेकिल्ल्याच्या पुढ्यात येताच आजही मजबूत तटबंदीने उभा असलेला हा दुर्ग पाहून नवा उत्साह संचारतो. बालेकिल्ल्याच्या भोवतीने खोल खंदक खोदलेला आहे. दोन बुरुजांनी युक्त अशा महाद्वारातून आपण बालेकिल्ल्यात प्रवेश करतो. या महाद्वारावर कमळाची शिल्पे कोरलेली आहेत.

आत जाताच एक मोकळे पटांगण दिसते. यामध्ये समोरच एक दुमजली इमारत दिसते. या इमारतीशेजारीच उतरत्या छपराचे गणपतीचे मंदिर आहे. याशिवाय सरखेल कान्होजी आंग्रे यांचा वाडा, काही घरांची जोती, सदरेची इमारत, दारूगोळ्याचे कोठार, एक-दोन खोल विहिरी, तळी, हा गड उभा करण्यासाठी बलिदान दिलेल्या जयबाचे स्मारक आदी स्थळविशेष पाहण्यास मिळतात. हे सारे पाहून झाले, की सभोवती फिरणारी तटबंदी खुणावू लागते. या तटावर ये-जा करण्यासाठी जागोजागी पायऱ्यांचे मार्ग ठेवलेले आहेत. जयगडच्या या बालेकिल्ल्यास तब्बल वीसहून अधिक बुरूज. यातील काही दुमजली. या तटावरून फिरतानाच गडाचा समुद्राकडील दुसरा दरवाजाही दिसतो. याच फेरीत पश्चिमेकडील श्री कऱ्हाटेश्वर महादेवाचे मंदिर, जयगड दीपस्तंभाचेही दर्शन घडते.

जयगडच्या इतिहासात डोकावले, की त्याच्या उभारणीचे श्रेय आदिलशहाकडे जाते. मात्र पुढे काही कालावधीतच तो संगमेश्वरच्या नाईकांच्या ताब्यात गेला. छत्रपती शिवरायांनी इसवी सन १६५७ ते ६० च्या दरम्यान जयगड स्वराज्यात आणला. महाराजांनी या दुर्गाला भक्कम करण्याचे काम केले. यानंतर जंजिऱ्याचा सिद्दी, आंग्रे घराणे, पेशवे असा सत्तेचा प्रवास करत जयगड अखेर १८१८ ब्रिटिशांच्या ताब्यात गेला.

गडाचा हा सारा इतिहास जागवत असतानाच जयगडच्या तटावरून पश्चिमेकडे लक्ष जाते. शास्त्री नदीची खाडी आणि त्यापुढील अथांग सिंधुसागराचा देखावा काही क्षण हरवून टाकतो. हे दृश्ये पाहातानाच त्यातील सौंदर्याबरोबरच इतिहास आणि भूगोलाचे नातेसंबंधही लक्षात येतात. मग या अचूक जागी उभ्या केलेल्या जयगडच्या निर्मितीचे रहस्यही या वेळी उलगडते.

निसर्गवेध



अंजन कांचन करवंदीच्या

वसंत ऋतूची चाहूल ही अनेक गोष्टींसोबतच फुलांच्या बहरानेही लागते. सह्याद्रीत सर्वत्र फुलणारी अंजन ही एक आपल्या प्रदेशाची ओळख. डोंगरदऱ्या भटकणाऱ्यांना ही वनस्पती तिच्या या बहराने साद घालू लागते. छोटे, पण डेरेदार वृक्ष, त्यांची गडद हिरवी रसरशीत पानं, कळ्यांचे अबोली रंगाचे पुंजके, फुलांच्या जांभळ्या-मोरपंखी-गुलाबी रंगछटा, त्यांचे सूक्ष्म नाजूक भाग आणि त्यांचा परिसरात दरवळणारा मंद सुगंध. महाराष्ट्राचा हा अंजन सध्या दऱ्याखोऱ्यांत सर्वत्र बहरलाय!

तृप्ती देशमुख

हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ०९, कम्युनिटी सेंटर, बसंत लोक, वसंत विहार, नवी दिल्ली -११००५७, फोन : ०११ ४९२६७०००, टोल-फ्री नं. : १८०० २१२ ८८००, ईमेल: customer.care@herohfl.com
वेबसाइट : www.herohousingfinance.com / सीआयएन : U65192DL2016PLC30148, संपर्क पत्ता : पहिला मजला, रघुवीर कॉम्प्लेक्स, डिस्ट्रिक्ट कोर्टसमोर, अदालत रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र, पीन - ४३१००५.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)
(सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२च्या रुल ८(१) यासह वाचलेल्या परिशिष्ट IV नुसार)

ज्याअर्थी, "हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणकोंवर फर्माविणारी याखाली नमूद केल्यानुसार मागणी सूचना निर्गमित केल्या आहेत.
ऋणको रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरले आहेत, विशेषकरून ऋणकोंना तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
विशेषकरून ऋणको व आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार याखाली नमूद केलेल्या तारखेपासून रकमेवरील व्याज व दंडात्मक व्याज, आकार, किंमत, इ. सह याखालील संदर्भित रकमेकरिता "हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.

लोन अकाऊंट नं.	बंधनग्रहीता / विधि वारसदार / विधि प्रतिनिधीचे नाव	मागणी सूचनेची तारीख / मागणी सूचनेनुसार रक्कम	ताब्याची तारीख (विधायक / प्रत्यक्ष)
HHFAURHOU23000041807, HHFAURLAP24000044892	संजय भीमराव वाघमारे, वाघमारे आशा संजय	२०.१२.२०२५ रु. २२,०७,८४१/- १५.१२.२०२५ रोजीप्रमाणे	०५.०३.२०२६ (सांकेतिक)

सुरक्षित मत्ता/स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - रेसिडेंशियल फ्लॅट नं. ०४, बिल्ट-अप एरिआ ४९.२६ चौ.मी., कार्पेट एरिआ ४६.४२ चौ.मी., बालकनी एरिआ २.५५ चौ.मी., ओपन टेरेस एरिआ ४.७२ चौ.मी., विंग - १ए४ टाईप बिल्डिंग सारा स्वप्नांगण फेज-२ सारा स्वप्नांगण-ए४, ए५, ए६ मधील स्टिल्ट पहिल्या मजल्यावरील, पुढील जमिनीचे सर्व खंड व तुकडे - जमीन धारण गट नं. ९३ / पार्ट व ९५ / पार्ट, मौजे गंगापूर जहांगिर, ता. व जि. औरंगाबाद. **पूर्व** : साईड मार्जिनल स्पेस, **पश्चिम** : प्लॉट नं. ०५ व विंग-०१ डक्ट, **उत्तर** : फ्लॅट नं. ०३ विंग ०१, **दक्षिण** : पाथवे.
दिनांक : १०.०३.२०२६ स्थळ : औरंगाबाद स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकरिता

पेगासस ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

PEGASUS
५५-५६, ५वा मजला, फ्री प्रेस हाऊस, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०००२१, टेलि : ९१-२२६१८८४७०० ईमेल : sys@pegasus-arc.com
यूआरएल : www.pegasus-arc.com

[परिशिष्ट - ४-ए]
[नियम ८ (६) मधील तरतुदी पहा]
स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलावासाठी जाहीर सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या ९ (१) सहवाचता नियम ८ (६) ची तरतुद सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ("सरफेसी कायदा") अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खाली नमूद केलेल्या कर्जदाराला, सह-कर्जदाराला, जामीनदाराला आणि गहाण ठेवणारे यांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेल्या सुरक्षित मालमत्तेची स्थावर मालमत्ता सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण ठेवली आहे/शुल्क आकारणी केली आहे, **पेगासस ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड, पेगासस २०२४ ट्रस्ट १ (पेगासस)** यांचे विश्वस्त म्हणून काम करत आहे, असाइनमेंट करार दिनांकित ३०.०६.२०२५ यानुसार एचडीएफसी बँक लिमिटेड ("एचडीएफसी बँक") यांच्याद्वारे खाली नमूद केलेल्या कर्जदाराची कर्जे आणि अंतर्निहित सिक्युरिटीज व्याज नियुक्त केले गेले आहेत, सरफेसी कायदा, २००२ च्या तरतुदींनुसार, सरफेसी कायदा आणि त्याअंतर्गत नियमांच्या तरतुदींनुसार **"जसे आहे, तिथे आहे", "जसे आहे, जे आहे"** आणि **"तिथे जे काही आहे " याआधारावर सर्व ज्ञात आणि अज्ञात दायित्वांसह दि. ३०.०३.२०२६** रोजी विक्री करण्यात येत आहेत.
एचडीएफसी बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने दि. ३१.०१.२०१८ रोजी सरफेसी कायदा आणि त्याअंतर्गत नियमांच्या तरतुदींनुसार खाली वर्णन केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा, स्थावर मालमत्तेचा ताबा घेतला आहे आणि **तो ताबा पेगासस २०२४ ट्रस्ट १ (पेगासस)** यांचे विश्वस्त म्हणून काम करणाऱ्या अधिकृत अधिकाऱ्याकडे सोपवला आहे.
लिलावाची माहिती खालीलप्रमाणे आहे :

कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार आणि गहाण ठेवणारे यांचे नाव	१) मेसर्स विशाल जिनिंग (कर्जदार) २) श्री. विशाल चांडक (भागीदार/जामीनदार) ३) श्रीमती शोभा चांडक (भागीदार/जामीनदार) ४) श्रीमती शीतल चांडक (भागीदार/जामीनदार) ५) श्रीमती शालिनी चांडक (भागीदार/जामीनदार)
ज्या थकबाकीसाठी सुरक्षित मालमत्ता विकल्या जात आहेत	**ज्या थकबाकीसाठी सुरक्षित मालमत्ता विकल्या जात आहेत: रु. ३,६२,१८,५६४/-** (रुपये तीन कोटी बासष्ट लाख अठरा हजार पाचशे चौसष्ट फक्त) **दि. १२.०१.२०१५** रोजीनुसार **दि. १३.०१.२०१५** रोजीपासून लागू होणारे पुढील व्याज, खर्च, शुल्क आणि त्यावरील खर्चासह सरफेसी कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत सूचनेनुसार देयके आणि वसूलीच्या तारखेपर्यंत.
सुरक्षित मालमत्ता ही स्थावर मालमत्ता आहे जी विकली जात आहे याचे तपशील	**गहाण ठेवलेले : मेसर्स. विशाल जिनिंग** बिगरशेती जमीन औद्योगिक युनिट रचनेसह, मोजमापे ०.८० एच आणि आर मौजा खापरखेडा, ग्रामपंचायत बेलाड, फील्ड गट क्र. २१, जुना सर्व्हे क्र. ६/१,७/१,७/४, ग्रामपंचायत बेलाड ताशील मलकापूर आणि जिल्हा बुलढाणा, महाराष्ट्र ४४३१०१ च्या हद्दीतील घर क्र. ५६८ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि खालीलप्रमाणे **सीमाबद्धः पूर्वः** श्री. शेषराव वामन पाटील यांच्या मालकीचे शेत, **पश्चिमः** श्रीमती विमलाबाई दिनकरराव रायपुरे यांच्या मालकीचे शेत, **उत्तरः** श्री. विजयकुमार चंपालाल चांडक यांच्या मालकीचे शेत, **दक्षिणः** वाघुड रोड अक्षांश आणि रेखांश : २०.८७८३१६, ७६.२३१५६४.
सेरसाई आयडी	सेरसाई मालमत्ता आयडीः २०००८३७६७८५९ सेरसाई एसआय आयडीः ४०००८१९९०७९६
ज्या आरक्षित किमतीपेक्षा कमी किंमतीत सुरक्षित मालमत्ता विकली जाणार नाही (रुपयांमध्ये)	रु. १,७१,३७,०००/- (रुपये एक कोटी एक्काहत्तर लाख सदतीस हजार फक्त)
इसारा ठेव अनामत (ईएमडी)	रु. १७,१३,७००/- (रुपये सतरा लाख तेरा हजार सातशे फक्त)
जर काही दावे असतील तर, जे मालमत्तेसाठी मांडले गेले आहेत आणि सुरक्षित धनकोला ज्ञात असलेले इतर कोणतेही थकित देणी आणि मूल्य	माहीत नाही
मालमत्तेची तपासणी	दि. २०.०३.२०२६ रोजी सकाळी ११.३० वा. ते दुपारी १.०० वाजेपर्यंत
संपर्क व्यक्ती आणि फोन नंबर	श्री. शुभोदीप बॅनर्जी, वरिष्ठ व्यवस्थापक, मोब क्र. ७७१००४२७३६ श्री. विशाल कापसे ७८७५४५६७५७
बोली सादर करण्याची शेवटची तारीख	दि. २८.०३.२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत
बोली उघडण्याची वेळ आणि ठिकाण	ई-लिलाव/बोली वेबसाइट (www.eauctions.co.in) याद्वारे दि. ३०.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत.

सदर हे प्रकाशन सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) सहवाचता ९(१) नियम ८(६) अंतर्गत निर्देशित कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार आणि गहाण ठेवणारे यांना पंधरा (१५) दिवसांची सूचना देखील आहे.
विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कोणतीही बोली सादर करण्यापूर्वी कृपया सुरक्षित धनको यांची वेबसाइट, म्हणजेच **http://www.pegasus-arc.com/assets-to-auction.html**, किंवा वेबसाइट **www.eauctions.co.in** पहा, किंवा सेवा प्रदात्याशी लिंकस्टार टेक सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड, बोलीदार समर्थन क्रमांकः ९८७००९९७१३, ईमेलः **admin@eauctions.co.in** यावर संपर्क साधा.

अधिकृत अधिकारी
ठिकाण : औरंगाबाद पेगासस ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
दिनांक : १०.०३.२०२६ पेगासस २०२४ ट्रस्ट १ च्या विश्वस्त म्हणून कार्यरत

HDB FINANCIAL SERVICES एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : राधिका, दुसरा मजला, लॉ गार्डन रोड, नवरंगपुरा, अहमदाबाद, गुजरात, पीनकोड - ३८०००९. **प्रादेशिक कार्यालय :** दुसरा मजला, विल्सन हाऊस, जुना नागरदास रोड, आंबोली सब-वे जवळ, अंधेरी (पू), मुंबई - ४०००६९ आणि तिच्या महाराष्ट्रातील विविध शाखा.

ताबा सूचना

ज्याअर्थी, **एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड**च्या प्राधिकृत अधिकारींनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२चे ५४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(२) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत सदर सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत प्रदानाच्या प्रत्यक्ष तारखेपर्यंत सर्व किंमत, आकार व खर्च यासह उक्त सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता संबंधित ऋणकोंवर फर्माविणारी याखाली तपशीलवारपणे दिल्यानुसार मागणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे. उक्त ऋणको/ सह-ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको/ सह-ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अमलबजावणीत यासह नमूद केलेल्या तारखे दिवशी उक्त ॲक्ट अंतर्गत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक ताबा** घेतला आहे. विशेषकरून ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार संबंधित तारखांपासून पुढील व्याज, किंमत व आकारासह त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेकरिता **एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड**च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.
अनुसूचीबद्ध मालमत्तेअंतर्गत ऋणको व सह-ऋणकोंच्या लोन अकाऊंट नंबर्ससह यूआयसी नं., थकित देणी, मागणी सूचनेची तारीख आणि ताब्याबाबत माहिती, इ. तपशील याखाली देण्यात आला आहे :

अनु	१. ऋणको, सह-ऋणको/ हमीदाराचे नाव व पत्ता, २. लोन अकाऊंट नं., ३. मंजूर झालेली कर्ज रक्कम, क्र. ४. प्रतिभूतींचा तपशील, ५. मागणी सूचनेची तारीख, ६. आयएनआरमधील दावा रक्कम, ७. ताब्याची तारीख
१	**१. ऋणको व सह-ऋणको/ हमीदाराचे नाव व पत्ता : १) सेंट्रल इंजिनिअरिंग वर्क्स, पत्ता** : गॅट नं. १७८ /१/ के, तिखि रोड, गुरुद्वारासमोर, धुळे, धुळे एचओ - ४२४००१, महाराष्ट्र. **२) साहील शफी शेख, निवासी पत्ता** : प्लॉट नं. ८४, भंगार बाजार, अन्सार नगर, खलिक भंगार समोर, धुळे एचओ - ४२४००१. **३) शेखशफी शेख शब्बीर, निवासी पत्ता** : प्लॉट नं. ८४, भंगार बाजार, अन्सार नगर, खलिक भंगार समोर, धुळे एचओ - ४२४००१, महाराष्ट्र. **४) परवीन शफी शेख, निवासी पत्ता** : प्लॉट नं. ८४, भंगार बाजार, अन्सार नगर, खलिक भंगार समोर, धुळे एचओ - ४२४००१, महाराष्ट्र. **२. लोन अकाऊंट नंबर : २८१५८९२९. ३. कर्ज रक्कम : रु. २५,००,००० /- (रुपये पंचवीस लाख फक्त). ४. प्रतिभूतींचे सविस्तर वर्णन : गहाणवट मालमत्ता** :- पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्तेवरील बांधकामासह उत्तरेकडील बाजूचा प्लॉट (हाऊस नं. १७८ चा), सर्व्हे नं. १७८ / १सी (सिटी सर्व्हे नं. ९८), मोजमापाचा एरिआ २९३.४० चौ.मी., झोन नं. ३१, येथे स्थित - मोहाडी पीआर. लालिंग, ता. व जि. धुळे - ४२४००१. **५. मागणी सूचनेची तारीख : १५.१२.२०२५. ६. आयएनआरमधील एकूण देय रक्कम : रु. २१,६३,१७२.८३/- (रुपये एकवीस लाख त्रेसष्ट हजार एकशे बहात्तर व पैसे त्र्याऐंशी फक्त) ०९.१२.२०२५ रोजी प्रमाणे** आणि आनुषंगिक खर्च, किंमत व आकार, इ. सह एकत्रित प्रत्यक्ष वसुलीपर्यंत पुढील संविदात्मक दरातील व्याज. **७. ताब्याची तारीख : ०९.०३.२०२६.**
२	**१. ऋणको व सह-ऋणको/ हमीदाराचे नाव व पत्ता : १) लकी फर्निचर, पत्ता** : एस आर नं. ४४१ / २, प्लॉट नं. ०३. गाजी कॉलनी, १०० फू. रोड, धुळे एचओ - ४२४००१, महाराष्ट्र. **येथे सुद्धा** : प्लॉट नं. ११, सर्व्हे नं. ४१२ / २ पैकी, सिटी सर्व्हे नं. १५११२, मोजमापाचा एरिआ ५५.०० चौ.मी., धुळे एचओ - ४२४००१, महाराष्ट्र. **२) सय्यदाबानो इफ्तेखारअहमद अन्सारी, पत्ता** : प्लॉट नं. ११, सर्व्हे नं. ४१२ / २, जुना वडजाई रोड, तिरंगा ताकी समोर, धुळे एचओ - ४२४००१. **३) इफ्तेखारअहमद अब्दूल लतिफ, पत्ता** : प्लॉट नं. ११, सर्व्हे नं. ४१२ / २, जुना वडजाई रोड, तिरंगा ताकी समोर, धुळे एचओ - ४२४००१. **२. लोन अकाऊंट नंबर : ५५०३६०३१. ३. कर्ज रक्कम : रु. २४,२०,०००/- (रुपये चोवीस लाख वीस हजार फक्त). ४. प्रतिभूतींचे सविस्तर वर्णन : गहाणवट मालमत्ता** :- पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - प्लॉट नं. ११ (मोजमापाचा एरिआ ५५.०० चौ.मी.), त्यावरील बांधकामासह, सर्व्हे नं. ४१२/ २ पैकी, (सिटी सर्व्हे नं. १५११२ धुळे येथे स्थित, एमसी धुळे - ४२४००१ अंतर्गत. **५. मागणी सूचनेची तारीख : १५.१२.२०२५. ६. आयएनआरमधील एकूण देय रक्कम : रु. २४,०७,२७७.५४/- (रुपये चोवीस लाख सात हजार दोनशे सत्याहत्तर व पैसे चौपन्न फक्त) ०९.१२.२०२५ रोजी प्रमाणे** आणि आनुषंगिक खर्च, किंमत व आकार, इ. सह एकत्रित प्रत्यक्ष वसुलीपर्यंत पुढील संविदात्मक दरातील व्याज. **७. ताब्याची तारीख : ०९.०३.२०२६.**

१. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनेकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत. २. कोणताही आक्षेप व समझौता याकरिता कृपया संपर्क साधावा : **श्री. अजय गालफाडे, मोबा. नं. ८७८८५५१६५५ (प्राधिकृत अधिकारी)/ चंद्रकांत कोळी (कलेक्शन मॅनेजर) मोबा. नं. : ७८७५३९५७३७, एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लि.**, पहिला मजला, माधव हाईट्स, ॲक्सिस बँकेच्या वरती, रिलायन्स डिजिटल जवळ, खेर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर - ४१३४१२.
स्थळ : धुळे स्वाक्षरी/- एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडकरिता
दिनांक : १०.०३.२०२६ अधिकृत स्वाक्षरीकर्ता

pnb Housing Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंत्रिक्श भवन, २२, के.जी. मार्ग, नवी दिल्ली-११०००१.
फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com
शाखा कार्यालय औरंगाबाद : ई-१, ई-२ व ई-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेंटर, अदालत रोड, औरंगाबाद-४३१००१, महाराष्ट्र.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अंतर्गत आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या रुल ८ (१) च्या अनुपालनार्थ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनांच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केल्यानुसार रकमेची परतफेड करण्याकरिता संबंधित ऋणकोंवर फर्माविणारी प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केलेल्या तारखेदिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणकोंना आणि आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केलेल्या तारखांदिवशी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्याला / तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषकरून ऋणकोंना तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी उक्त मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि उक्त मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार कर्ज करारनाम्याच्या अनुसार रक्कम व त्यावरील व्याज या रकमेकरिता "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.

लोन अकाऊंट नं.	ऋणको / सह-ऋणको / हमीदाराचे नाव	मागणी सूचनेची तारीख	थकीत रक्कम	ताबा घेतल्याची तारीख	गहाणवट मालमत्तेचे वर्णन
HOU/ARNG/0322/970074, NHL/ARNG/0123/1075057 शाखा कार्यालय : औरंगाबाद	पारस बाबूलाल सोन्नी / कविता वसंत हजबान	०८.१२.२०२५	रु. १७०९७१२.३१/- (रुपये सतरा लाख नऊ हजार सातशे बारा व पैसे एकतीस फक्त)	०४.०३.२०२६ (सांकेतिक)	फ्लॅट नं. ०८, स्टिल्ट दुसरा मजला, एफ - टाईप बिल्डिंग, सारा स्वप्नांगण फेज-२, गट नं. ९३ / पी व ९५ / पी, व्हिलेज गंगापूर जहांगीर, औरंगाबाद-४३१००१, महाराष्ट्र.
HOU/ARNG/0622/1005673 शाखा कार्यालय : औरंगाबाद	मीना मधुकरराव नवागिरी / मर्सी प्रिन्स दास्स	०८.१२.२०२५	रु. १७१४२९०.३/- (रुपये सतरा लाख चौदा हजार दोनशे नव्वद व पैसे तीस फक्त)	०४.०३.२०२६ (सांकेतिक)	फ्लॅट नं. बी-०४, प्लॉट नं. ०१, गट नं. ४७-पार्ट, "कुपर हाईट्स"च्या पहिल्या मजल्यावरील, विंग बी, व्हिलेज हिरापूर, ता. व जि. औरंगाबाद - ४३१००१, महाराष्ट्र, भारत.

स्थळ : औरंगाबाद, दिनांक : १०.०३.२०२६ प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.

Utkarsh Small Finance Bank

Aapki Ummeed Ka Khaata
(A Scheduled Commercial Bank)

झोनल कार्यालय : रूपा सफायर, एकविसावा मजला, सेक्टर १८, सानपाडा रेल्वे स्टेशनसमोर, वाशी, नवी मुंबई (महा.)-४००७०५
नोंदणीकृत कार्यालय : उत्कर्ष टॉवर, एनएच-३१ (एअरपोर्ट रोड), सेहमलपूर, काझी सराई, हरहुआ, वाराणसी, उप्र-२२१ १०५.

मागणी सूचना, याद्वारे सूचित करण्यात येते की, पुढील कर्जदाराने त्यांनी बँकेकडून प्राप्त केलेल्या कर्ज सुविधेच्या मुद्दल व व्याजाच्या परतफेडीमध्ये कसूर केली आहे आणि कर्ज अनुत्पादक मत्ता (एनपीए) म्हणून वर्ग करण्यात आले आहे. त्यांनी बँकेस दिलेल्या त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ मधील अनुच्छेद १३(२) अंतर्गत सूचना जारी करण्यात आल्या होत्या, की त्याशिवाय खाली नमूद सदर कर्जदारांच्या माहितीसाठी सदर कर्जदारांना सदर जाहीर सूचनेच्या माध्यमातून सूचित करण्यात येत आहे.

अ. क्र.	शाखेचे नाव	खात्याचे नाव	कर्जदार / जामीनदाराचे नाव (मालमत्तेचे मालक)	भारग्रस्त / तारण मालमत्तेचे वर्णन	एन.पी.ए. दिनांक	मागणी सूचनेच्या दिनांकास थकबाकी रक्कम
१.	नांदेड	नागनाथ गोविंदराव प्याडेकर	नागनाथ गोविंदराव प्याडेकर (कर्जदार), गोविंद लक्ष्मण पायडेकर (सह-कर्जदार/ गहाणकार)	६४४/२०११, गट क्र. १२६, प्लॉट क्र. ५०, ग्र.प.ह.क्र. ११९४, क्षेत्रफळ सुमारे १२२ चौ.फू., कसराळी, तालुका-बिलोळी, जिल्हा नांदेड-४३१७१०. चतु:सीमा : पूर्वेस- प्लॉट क्र. ५०-ए, पश्चिमेस-१५ फू. अंतर्गत रस्ता, उत्तरेस- प्लॉट क्र. ४९, दक्षिणेस- प्लॉट क्र. ५१.	०८.०१.२०२६	रु. २,२५,२२१.१७/-

वरील कर्जदार आणि / किंवा त्यांच्या जामीनदारांना (लागू असेल तेथे) आवाहन करण्यात येते की, त्यांनी अनुच्छेद १३(२) अंतर्गत सूचना जारी करण्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत थकबाकीचा भरणा करावा, अन्यथा सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ मधील तरतुदींनुसार अनुच्छेद १३(२) अंतर्गत सूचना जारी करण्याच्या दिनांकापासून ६० दिवस लोटल्यानंतर पुढील पावले उचलण्यात येतील.

दिनांक : १०.०३.२०२६ स्वा/- (प्राधिकृत अधिकारी),
स्थानः नांदेड (उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लि.)

punjab national bank

Together for the better

स्ट्रेस्ड ॲसेट मॅनेजमेंट ब्रांच, मुंबई
पीएनबी प्रगती टॉवर, १ला मजला, प्लॉट सी-९, ब्लॉक जी, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१, ई-मेल : zs8356@pnb.co.in

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२च्या नियम ८(६) ची तरतुद सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि गहाण ठेवणारे यांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण ठेवल्या आहेत/शुल्क आकारणी केल्या आहेत, ज्याचा प्रतिकात्मक ताबा बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने/ सुरक्षित धनको यांनी घेतला आहे, खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि गहाण ठेवणारे यांच्याकडून बँक/ सुरक्षित धनको यांच्याकडे देय असलेल्या देयकाच्या वसुलीसाठी ई-लिलावाद्वारे दि. २७.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत **"जसे आहे, तिथे आहे", "जसे आहे, जे आहे"** आणि **"तिथे जे काही आहे"** या तत्वांवर विक्री करण्यात येतील आणि आवश्यक असल्यास १० मिनिटांची मुदतवाढ दिली जाईल. आरक्षित किंमत आणि इसारा ठेव अनामत रक्कम संबंधित मालमत्तेसाठी खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.

सुरक्षित मालमत्तेचे परिशिष्ट

अ. क्र.	शाखेचे नाव / खात्याचे नाव / कर्जदाराचे नाव आणि पत्ते/हमीदार खाते	गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन/मालकाचे नाव (मालमत्ता गहाण ठेवणारा)	अ) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचनेची तारीख ब) दि. ३१.१२.२०२४ रोजीनुसार थकबाकी असलेली रक्कम. क) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४) अंतर्गत ताबा तारीख ड) ताब्याचे स्वरूप प्रतिकात्मक/ भौतिक/रचनात्मक	अ) विक्री किंमत (भारतीय रुपयात) ब) ईएमडी (भारतीय रुपयात) क) बोली वाढीव रक्कम (भारतीय रुपयात)	ई-लिलावाची तारीख/वेळ
१	**स्ट्रेस्ड ॲसेट मॅनेजमेंट ब्रांच, मुंबई मेसर्स जवाहर शेतकरी सहकारी सूत गिरणी लि.** पत्ताः हुतात्मा शिरीषकुमार नगर, साक्री रोड, मोरणे धुळे - ४२४००१ (महाराष्ट्र)	कारखान्याची जमीन आणि शेड येथे गट क्र. २२, २२/१, २३, २४, २५, ३/३ आणि गट क्र. २०, २१, एसीपीएम डेंटल कॉलेजसमोर, सुरत नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६, मोराणे प्रा लालिंग, तालुका व जिल्हा धुळे, महाराष्ट्र क्षेत्रफळ : ३२१६०० चौ.मी मालक/गहाण ठेवणारे : जवाहर शेतकरी सहकारी सूत गिरणी लि.	अ) १३.०१.२०२५ ब) रु. ३६.६४ कोटी अधिक एनपीएच्या तारखेपासूनचे व्याज आणि शुल्क क) २०.०५.२०२५ ड) प्रतिकात्मक ताबा	अ) रु. १२४,६५,००,०००.०० ब) रु. १२,४६,५०,०००.०० क) रु. १०,००,०००.००	२७.०३.२०२६ सकाळी ११.०० वा. ते दुपारी ४.०० वा.
२	पत्ताः एसीपीएम दंत महाविद्यालयसमोर, सुरत - नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६, मोरणे प्रा लालिंग, तालुका आणि जिल्हा - धुळे (महाराष्ट्र)	गट क्र. ३२/२, १७२/१, १७२/२, १७२/३-१, १७३/२/अ, आणि १७३/२/बी, एसीपीएम दंत महाविद्यालयासमोर, मोराणे प्रा लालिंग, तालुका आणि जिल्हा धुळे, महाराष्ट्र क्षेत्रफळ : ५२८०० चौ.मी मालक/ गहाण ठेवणारे : जवाहर शेतकरी सहकारी सूत गिरणी लि.		अ) रु. १३,८६,००,०००.०० ब) रु. १,३८,६०,०००.०० क) रु. ५,००,०००.००	

सुरक्षित कर्जदारांना ज्ञात असलेल्या भारांची माहिती - आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि अधिकृत अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या ई-लिलाव विक्री सूचना १३.११.२०२५ यानुसार राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या बाजूने त्याच्या कर्जासाठी सुरक्षित मालमत्तेवर देय रक्कम रु. ७१,२७,२१,२८१.०० दि. १३.११.२०२५ रोजीनुसार अधिक कर्जदाराकडून अतिरिक्त व्याज आणि त्यावर आकारणी भार आहे (दुसरे शुल्क)

अटी आणि शर्ती :
विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ यामध्ये नमूद केलेल्या अटी आणि शर्ती आणि पुढील अटींच्या विषयाधीन असेल :
१. "जसे आहे, जिथे आहे", "जसे आहे, जे आहे" आणि "तिथे जे काही आहे" या तत्त्वावर मालमत्ता यांची विक्री करण्यात येत आहे.
२. वरील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या सुरक्षित मालमत्तेचे तपशील अधिकृत अधिकाऱ्याच्या माहितीनुसार दिले आहेत, परंतु या घोषणेतील कोणत्याही त्रुटी, चुकीच्या विधानासाठी किंवा वगळण्यासाठी अधिकृत अधिकारी जबाबदार राहणार नाहीत.
३. विक्री ही वरील तक्त्यात नमूद केलेल्या तारखेला आणि वेळेला वेबसाइट https://baanknet.com यावर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे निम्नस्वाक्षरीकार यांच्याद्वारे केली जाईल.
४. अधिकृत अधिकारी कोणत्याही वेळी कोणतेही कारण न देता कोणत्याही/सर्व बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा, किंवा लिलावाच्या अटी पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा/स्थगित करण्याचा/बंद करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार राखून ठेवतात आणि सदर या संदर्भात त्यांचा निर्णय अंतिम असेल.
५. सर्व वैधानिक देणी/ अटेंडंट शुल्क/ इतर देणी, ज्यात नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, वीज देणी इत्यादींचा समावेश आहे, खरेदीदाराने स्वतःहून भरावा.
६. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया www.pnbindia.in पहा.
दिनांक : ०९.०३.२०२६
ठिकाण : मुंबई

(पी.के. भिसीकर)
मुख्य व्यवस्थापक
अधिकृत अधिकारी
पंजाब नॅशनल बँक, सुरक्षित धनको